**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६** **<u>नि.फौ.ख.क्र.३१/२०२२</u>**

महाराष्ट्र शासन वि. तुषार सुर्यवंशी

**नि.क्र. ५५**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नाव – सुनिल संपतराव माळशिखारे

वय – ५४ वर्षे

व्यवसाय – सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक,

सध्या नेमणुक – मिरजगाव पोलीस स्टेशन

राहणार – मिरजगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर

**<u>अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जी. बी. नेवसे यांच्यामार्फत सरतपास शपथेवर सुरुः–</u>**

दि. २६/०१/२०२२ रोजी मी कर्जत पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. व ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत होतो. त्यावेळेस माझ्याकडे सतिष अंकुश सुद्रिक आले होते. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी फिर्याद नोंदवलेली आहे. नि.क्र.३१ वरील फिर्याद मी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलली असुन त्यावर फिर्यादीची सही असुन माझी देखील समक्ष म्हणुन सही आहे. फिर्यादवरुन मी गु.र.नं. ५१/२०२२ नोंदवला. वरीष्ठांच्या आदेशानुसार गुन्ह्याचा तपास माझ्याकडे आला. दि. २७/०१/२०२२ रोजी घटनास्थळावर जाऊन दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. आता तो पंचनामा मला दाखवला. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.५६</u>** देण्यात यते. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. फिर्याद दाखल झाली त्यादिवशी जखमीला उपजिल्हा रुग्णालय कर्जत येथे पाठवले होते. त्यानंतर फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन दोषारोपपत्रात दाखल केले. आता मला ते दाखवले, ते तेच आहे. दि. १४/०२/२०२२ रोजी आरोपी मिळून आले. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेले हत्यार हजर केले. ते दोन पंचांसमक्ष मी जप्त केले. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर दोन पंचांच्या सह्या आहेत. तसेच माझी देखील सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.५७</u>** देण्यात येते. आरोपींकडून जप्त केलेल्या वस्तु मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला एम.आर.नं. १०/२०२३ वरील आर्टिकल अ व ब या दोन वस्तु दाखवल्या. त्या त्याच वस्तु आहेत. त्यावर माझी व पंचाच्या सह्याचे कागदी

चिठ्ठ्याचे लेबल लावले आहे. आरोपीविरुध्द पुरावा आढळून आल्यामुळे मी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. एक आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. तपासामध्ये फिर्यादीला मारहाण केल्याचे निष्पन्न झाले.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी. व्ही. शिंदे यांच्यामार्फत उलटतपास सुरु.**

२. मी ३३ वर्षांपासून पोलीस सेवेत नोकरी करत आहे. मी औरंगाबाद शहर, नगर तालुका, कर्जत पोलीस स्टेशन व मिरजगाव पोलीस स्टेशन याठिकाणी काम केलेले आहे. गुन्हा दाखल झाला त्यावेळी मी ठाणे अंमलदार होतो. हे खरे नाही की, ठाणे अंमलदार असल्यामुळे तपास वरिष्ठांकडे जातो. हे खरे आहे की, वरिष्ठ अधिकारी हे तपास कोणाकडे द्यायचा ही नेमणुक करतात. तपास माझ्याकडे दिल्याबद्दलचा लेखी आदेश अभिलेखावर दाखल नाही. पंचनामा मी स्वतः जाऊन केला. हे खरे आहे की, पंचनामा केला त्याठिकाणाच्या जवळ टायरचे दुकान, कटिंगचे दुकान तसेच पंक्चर काढण्याचे दुकान देखील आहे. घटनास्थळाच्या पश्चिम दिशेस एक कटिंगचे दुकान आहे. पंचनामा केला त्यावेळेस या दोन दुकानदारांचे जबाब मी नोंदवले नाही. हे मला सांगता येणार नाही की, पंचनाम्यातील पंच हे फिर्यादीचे भाऊ व चुलते आहेत. घटनास्थळाच्या चतुःसिमेला कोणते गट नंबर आहेत हे मला सांगता येणार नाही. साक्षीदारांचे जबाब मी पोलीस स्टेशनला बोलावुन नोंदवले आहेत. हे खरे नाही की, अधिकार नसताना मी गुन्ह्याचा तपास केला व फिर्यादीशी हात मिळवणी करुन खोटे दोषारोप दाखल केले आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.01.20 16:46:11 +0530

(आर. बी. राऊत)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत

(न्यायालय क्र. २)

दिनांकः २०/०१/२०२६.